| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : १६/०७/२०२५ |
| नोंदणी दिनांक | : १८/०७/२०२५ |
| निकाल दिनांक | : ०९/०३/२०२६ |
| कालावधी | : वर्षे महिने दिवस |
| | ०० ०७ २१ |

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०६/२०२५ मधील न्यायनिर्णय</u>

**(निशाणी क्र. ०६ लगत )**

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र.XXXII प्रमाणे**

**भाग–'अ'**

**(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I)]

| **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी श्री. आदित्य घ. नाईक)<br>निकाल तारीख ०९/०३/२०२६<br>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०६/२०२५<br>सीएनआर क्र. एमएचडीएच ०४०००३८५२०२५<br>(अपराध क्र. ६६/२०२५, दोंडाईचा पोलीस ठाणे)** | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र राज्य,<br>तर्फे दुय्यम निरीक्षक अधिकारी,<br>राज्य उत्पादन शल्क, कार्यालय<br>शिरपुर, ता. शिरपुर, जि. धुळे. |
| **सरकार तर्फे विद्वान वकील** | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | | रामचंद्र वामन पाटील,<br>वय–६३ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा. विखरण देवाचे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |
| **आरोपीतर्फे विद्वान वकील** | | ॲड. श्री. जे. व्ही. तायडे |

**भाग–'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १३/०४/२०२५ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | १३/०४/२०२५ |
| दोषारोप–पत्र दाखल झाल्याचा दिनांक | १६/०७/२०२५ |
| अपराधाचा तपशिल सांगीतल्याचा दिनांक | १९/१२/२०२५ |
| पुरावा आरंभ झाल्याचा दिनांक | २०/०१/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता राखुन ठेवल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | — |

**आरोपीचा तपशील**

| **अ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक केल्याचा दिनांक** | **जमानतीवर सोडल्याचा दिनांक** | **दोषारोपामधील कलमे** | **दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी** | **देण्यात आलेली शिक्षा** | **फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामचंद्र वामन | | १९.१२ २०२५ | महाराष्ट्र दारु बंदी | निर्दोष मुक्त | — | — |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाटील | | | अधिनियम कलम ६५–ई प्रमाणे. | | | |

**भाग–'क'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | केतन रजेसिंग जाधव | फिर्यादी | ०६ लगत |
| २. | अंबालाल रामसिंग गिरासे | घटनास्थळ पंचनाम्याचे पंच | ०६ लगत |
| ३. | भटु साहेबराव भिल | घटनास्थळ पंचनाम्याचे पंच | ०६ लगत |

**ब) बचाव पक्ष, असल्यास :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची/निशाणींची यादी

अ) अभियोग पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | १० | फिर्याद |
| २. | ११ | पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्र. २ ची सही |
| ३. | १२ | पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्र. ३ ची सही |

ब) बचाव पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

क) न्यायालयीन :–

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| – | – | – |

ड) भौतिक वस्तु :–

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्र. | तपशिल |
|---|---|---|
| | | |

## न्यायनिर्णय

(पारित दिनांकः ०९/०३/२०२६)

आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयांकरीता संपरिक्षेचा सामना केला आहे.

०२. आरोपीला नि.क्र.०६ अन्वये गुन्हयाचा तपशील स्पष्ट करुन त्याचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

०३. प्रस्तुत खटल्यामध्ये न्यायनिर्णय करीत असताना, माझे विचारार्थ निघालेले मुद्दे आणि त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक १३.०४.२०२५ रोजी मौजे विखरण देवाचे, ता. शिंदखेडा, जि. धुळे शिवारात हॉटेल योगेश दोंडाईचा ते सोनगीर रस्त्यालगत, सार्वजनीक जागी, आरोपी स्वतःच्या फायदयासाठी विनापास परवाना प्रतिबंधीत माल म्हणजेच देशी दारु टँगो पंच बेकायदेशीर रित्या स्वतःच्या कब्जात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला आणि त्यायोगे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २) | अंतिम आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करणेत येते. |

## कारणमिमांसा

०४. अभियोग पक्ष हा भाग–'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे तोंडी व कागदोपत्री असलेल्या पुराव्यावर अवलंबुन राहीला आहे. आरोपीचे भा.ना.सु.सं. कलम ३५१ (१)(ब) प्रमाणे निवेदन नि. क्र. १४ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे. त्यामध्ये, त्याने अभियोग

पक्षाचा पुरावा नाकारुन त्याचे विरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे. आरोपीने त्याच्या बचावार्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

०५. अभियोग पक्षातर्फे विव्दान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच आरोपीतर्फे विव्दान विधीज्ञ श्री. जे. व्ही. तायडे यांचा युक्तीवाद ऐकला.

## <u>मुद्दा क्र.१ करीता</u> :–

०६. अभियोग पक्षाने आरोपी हा त्याच्या ताब्यात बेकायदेशीररित्या व विनापरवाना प्रतिबंधीत दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता हे सिध्द करणे आवश्यक आहे.

०७. फिर्यादी (सा.क्र.१) याने त्याच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटना दि. १३.०४.२०२५ रोजीची आहे. त्यादिवशी ते जवान म्हणुन दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शिरपुर येथे कार्यरत होते. त्यादिवशी दुय्यम निरीक्षक श्री. ए. सी. मानकर यांना गुप्त बातमीदाराद्वारे बातमी मिळाली की, हॉटेल योगेश, विखरण शिवार, येथे एक इसम अवैधरित्या देशी व विदेशी दारुची चोरटी विक्री करतो. त्यानुसार मे. साहेबांनी विखरण गावाजवळ दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांना सदर बातमीची सविस्तर माहिती सांगुन पंच म्हणुन काम पाहण्याची विनंती केली. ते पंच म्हणुन येण्यास तयार झाले. त्यानंतर मिळालेल्या बातमीनुसार खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी जाऊन हॉटेल योगेश येथे त्यांनी त्यांचे वाहन उभे केले. फिर्यादीच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की,मिळालेल्या बातमीनुसारच्या हॉटेलमध्ये गेले असता तेथे एक इसम हजर होता. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रामचंद्र वामन पाटील, रा. विखरण, ता. शिंदखेडा, जि. धुळे असे सांगितले. फिर्यादीच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी हॉटेलची तपासणी केली असता एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु टॅंगो पंचच्या १८० मी. ली. मापाच्या ४५ सिलबंद बाटल्या मिळुन आल्या. त्यावर मे. साहेबांनी सी.ए. तपासणी करीता देशी दारु टॅंगो पंचची

त्यातील १८० मिली मापाची एक बाटली काढून साहेबांच्या व पंचांच्या सह्यांचे लेबल लावून बाटली सिल बंद केली. तसेच नमुना सिल बंद बाटली व उर्वरित मुद्देमाल जप्त करुन तपासकामी ताब्यात घेतला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्यामध्ये काहीही मौल्यवान वस्तु मिळुन आली नाही. त्यानंतर आरोपीला बीएनएसएस कलम ३५ प्रमाणे नोटीस देवुन सोडले. त्यानंतर त्याने पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द रितसर फिर्याद दाखल केली. फिर्यादी (सा.क्र.१) यांच्या तोंडी पुराव्यास फिर्याद (नि.क्र.१०) मधील कथने पुष्टी देतात.

०८. अंबालाल (सा.क्र.२) व भटु (सा.क्र.३) या अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदारांनी त्यांचे पुराव्यादरम्यान अभियोग पक्षाला मदत होईल अशी साक्ष दिलेली नाही. सदर पंच साक्षीदार हे अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उलटतपासास्वरुप प्रश्न विचारले. परंतु, त्यायोगे देखील अभियोग पक्षाच्या हकिकतीस पुष्टी देणारा असा कोणताही पुरावा अभियोग पक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

०९. फिर्यादी (सा.क्र.१) ने अभियोग पक्षाच्या हकिकतीस मदत होईल अशी साक्ष दिल्याचे वरील पुराव्यावरुन स्पष्ट होते. परंतु, अंबालाल (सा.क्र.२) व भटु (सा.क्र.३) या पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीस पुरक अशी साक्ष दिलेली नाही. प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. त्यामुळे, आरोपीचे विरुध्द त्याचे ताब्यातून पंचांसमक्ष प्रतिबंधीत मद्य जप्त झाली होती असा निष्कर्ष काढणे रास्त होणारे नाही. सबब, प्राप्त परिस्थितीमध्ये अभियोग पक्षाने केलेल्या आरोपाप्रमाणे खरोखरीच आरोपीच्या ताब्यातून वरील वर्णनाची देशी दारु टँगो पंच मिळून आली होती व ती पंचांसमक्ष जप्त झालेली होती, ही बाब ठोस पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही. केवळ उत्पादन शुल्क कार्यालय यांचेकडील कर्मचारी असलेल्या फिर्यादी (सा.क्र.१) याच्या तोंडी पुराव्यावर विसंबून राहून तसा निष्कर्ष काढणे न्यायोचित होणार नाही.

०९. तसेच, येथे हेही नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये

आरोपीच्या ताब्यातून कथितरित्या जप्त केलेल्या मुद्देमालापैकी प्रत्यंतराकरीता काढून घेण्यात आलेली बाटली ही रासायनिक परिक्षणाकरीता मा.केमिकल ॲनालायझर यांचेकडे पाठविण्यात आलेली होती व ती त्यांना प्राप्त झाली होती असे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. तसेच, सर्वात महत्वाचे म्हणजे सदर मुद्देमालाबाबत रासायनिक परिक्षणाबाबतचा अहवाल अभिलेखावर सादर केलेला नाही. केवळ उत्पादन शुल्क कार्यालय यांचेकडील कर्मचारी असलेल्या फिर्यादी याच्या तोंडी पुराव्यावर विसंबून, आरोपीच्या ताब्यातून कथितरित्या जप्त केलेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम या कायद्याखाली प्रतिबंधीत असलेले मद्य होते, असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. सबब, आरोपीच्या ताब्यातून कथितरित्या जप्त केलेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम या कायद्याखालील प्रतिबंधीत मद्य असल्याचे अभियोग पक्षातर्फे ठोस पुराव्यानिशी सिध्द करण्यात आलेले नाही.

१०. वरील विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की, प्रस्तुत खटल्याचे कामी अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन आरोपी याचे ताब्यातून कथितरित्या जप्त झालेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कायद्याखालील निषिध्द मद्य असल्याचे व तो मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून मिळून आल्याचे व जप्त झाल्याचे, कोणत्याही संयुक्तिक शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरलेला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

## <u>मुद्दा क्र.२ करीता</u> :–

११. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरल्याकारणाने मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे. सबब, आरोपीची या खटल्यातून निर्दोषपणे मुक्तता करणे न्यायोचित होणारे आहे. सबब, मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:–

## -: आदेश :-

१. आरोपी रामचंद्र वामन पाटील याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करणेत येते.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपीलाकरीताचा कालावधी पूर्ण झालेनंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, धुळे यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविणेत यावा.

४. आरोपी याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये, रुपये १५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तिक मुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.03.09 17:55:40 +0530

स्थळ : दोंडाईचा (श्री. आदित्य घ. नाईक)
दिनांक : ०९/०३/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – गणेश साईनाथ अहिरे
न्यायालयाचे नांव – दिवाणी व फौजदारी न्यायालय, दोंडाईचा.
दिनांक – ०९.०३.२०२६

सही/–
लघुलेखक श्रेणी–३